संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

रोखठोक बेधडक

संपादकीय.....

।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# एलईडी दिव्यांची चंदेरी सुपारी

पाऊस थोडासा तरी चिखल जास्त अशी आज भारतीय जनता पार्टीची अवस्था झाली. केंद्रात सत्तेत येऊन एक वर्षही झाले नाही आणि राज्यात सत्तेचे दहा महिनेही पूर्ण झालेले नाहीत. तरीदेखील वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये हा पक्ष गुंतत चाललेला दिसून येतो. मध्यप्रदेशातल्या व्यापम घोटाळ्याने एकूणच पक्षाची प्रतिमा बऱ्यापैकी डागाळली गेली आहे. तर त्यापूर्वी केंद्रीय मंत्री सुषमा स्वराज यांनी आयपीएल क्रिकेटमधल्या कथित गैरव्यवहारांचा सुभेदार ललित मोदीला दिलेल्या खास वागणुकीविषयी निर्माण झालेला वाद, राजस्थानच्या मुख्यमंत्री वसुंधरा राजे यांनीदेखील ललित मोदीविषयी दाखवलेली विशेष आस्था, छत्तीसगढमधील मुख्यमंत्र्यांवर तांदुळ खरेदीविषयी झालेला आरोप त्यापाठोपाठ राज्यामध्ये काही मंत्र्यांवर झालेले वेगवेगळे आरोप, हे सगळे चक्रव्यूह थांबण्याऐवजी वाढण्याचीच चिन्हे दिसत आहेत. कारण गेल्या काही दिवसांपासून मुंबईतल्या एलईडी दिव्यांचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे.

ईशान्य मुंबईमध्ये घरोघरी एलईडी दिवे आणि सुलभ शौचालय अशा प्रकारची बॅनरबाजी करून स्वस्तात एलईडी दिवे देण्याचा मोठाच घाट घातला गेला आहे. म्हणजे एक प्रकरण थांबत नाही तर दुसरे येऊन उभे ठाकते, अशी सध्या पक्षाची स्थिती आहे. या सगळ्या गोष्टींना आवर कसा घालायचा हा मोठाच प्रश्न असून, कदाचित या सगळ्या गोष्टींची झाडाझडती घेण्यासाठीच पक्षाध्यक्ष अमित शहा मुंबईत दाखल होत असावेत. हा सगळा प्रकार पाहिल्यानंतर स्वच्छ शासन किंवा भ्रष्टाचार मुक्त प्रशासन अशा ज्या काही लोकांच्या माफक अपेक्षा होत्या, त्या हा पक्ष किंवा भाजपा सेना युतीचे सरकार पूर्ण करू शकत नाही हे सिध्द होते. कारण तशी कोणतीही पारदर्शकता स्पष्टपणे नजरेला येत नाही. सध्या तरी काँग्रेस ज्या पध्दतीने राज्यकारभार करीत होती, त्याचाच परिपाठ पुढे चालू आहे. नोकरवर्गालादेखील तसाच परिपाठ पुढे चालू राहावा, अशी तीव्र इच्छा असल्यामुळे एकूण कारभारामध्ये मुलभूत बदल होईल अशी आज तरी स्थिती दिसत नाही. इतकी सगळी प्रकरणे बाहेर येत असताना पक्षनेतृत्वाने, नेत्यांनी किंवा कार्यकर्त्यांनी आपले डोके ठिकाणावर ठेवणे गरजेचे ठरते. एकीकडे नरेंद्र मोदींसारख्या नेत्याची प्रतिमा आणि दुसरीकडे वेगवेगळ्या आरोपांमुळे पक्षावर होत असलेली चिखलफेक हा विरोधाभास सामान्य जनतेला धक्कादायक वाटू लागतो आणि मग देशाचा कारभार किंवा राज्यातला भ्रष्टाचार हा एकट्या मोदींमुळे कमी होऊ शकत नाही याचीही जनतेला खात्री पटू लागते.

## विजेच्या वेगाने व्यवहार

सत्तेत नसताना काँग्रेसवर भ्रष्टाचाराचे आणि गैरव्यवहाराचे आरोप करण्यात भाजपाचे नेते आघाडीवर असायचे. एकेक घोटाळा बाहेर काढण्यात आपण कसे वाक्‌बगार आहोत, असे चित्र निर्माण करून प्रसिध्दी मिळवण्याचे कामही मुंबईतले एक खासदार महोदय नेहमी करत असतात. आता एलईडी दिव्यांचे प्रकरण असेच एखाद्या घोटाळ्यासारखे बूमरँग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मरिन ड्राईव्हवर सोडियम व्हेपरचे दिवे काढून एलईडी दिवे बसवण्याचा डाव खेळला गेला. केवळ महिन्या दीड महिन्यामध्ये सगळे सोपस्कार पार पाडले गेले.जिथे मुंबईतल्या सामान्य माणसाचे प्रश्न वर्षानुवर्षे सुटत नाहीत तिथे एलईडी दिवे लावण्याचा प्रस्ताव दीड महिन्यात विजेच्या वेगासारखा मंजूर झाला. नुसता मंजूरच झाला नाही तर पटापट तिथले दिवे काढून एलईडी दिवे बसवले गेले.

वेगवान कारभाराच्या या नमुन्यामध्ये नक्कीच काहीतरी मेख असावी. असे कोणालाही वाटू शकते. वीज वाचवणे आणि स्वस्तातले एलईडी दिवे वापरून महापालिकेची बचत करणे अशी कारणे दाखवणारे उदार कर्ण अचानक महापालिकेत प्रगटले. आता जेव्हा न्यायालयानेच दणका देऊन मरिन ड्राईव्हवर पुन्हा पूर्वीचेच दिवे बसवावे असा आदेश दिला तेव्हा या घिसाटघाईमध्ये काही मंडळी खीर खाण्याचा प्रयत्न करत होते हे उघड होऊ लागले आहे.ज्या कंपनीकडून एलईडी दिवे घेतले गेले ती केंद्र सरकारची कंपनी आहे. त्यात भ्रष्टाचार होण्याची शक्यताच नाही. असे पोरकट समर्थन पालिकेतले भाजपाचे गटनेते मनोज कोटक यांनी केले. काही तरी दडपून नेण्यासाठी काहीतरी त्रोटक युक्तिवाद करण्याची त्यांची सवय दिसते. मुळातच केंद्र सरकारची ही कंपनी एलईडी दिवे बनवत नाही. तिला काही एलईडी उत्पादकांकडून ते बनवून घेण्याचा आदेश दिला गेला. कोणाच्या तरी घनिष्ठ संबंधातल्या या उद्योजकांचे उखळ पांढरे करण्याकरता एलईडीच्या सापशिडीचा खेळ खेळला गेला आणि आता तो अंगाशी येण्याची शक्यता दिसते.

## बेंबीच्या देठापासून आरोळ्या

यातला आणखी एक विचित्र प्रकार म्हणजे ईशान्य मुंबईतल्या काही उपनगरांमध्ये रहिवाशांना तीनशे रुपयांचा एलईडी दिवा शंभर रुपयात देण्याचे मोठे राजकीय कार्यक्रम होत आहेत आणि या दिव्यांची किंमत ग्राहकांच्या लाईट बिलातून वसूल करण्याचे फतवे निघाले आहेत. याचा अर्थ एलईडी दिवे बनवणाऱ्या कंपन्यांना अशा पध्दतीने किंवा मागच्या दाराने हमखास गिऱ्हाईक मिळवून देण्याची सुपारी काही लोकप्रतिनिधींनी घेतलेली दिसते.

मरिन ड्राईव्हवरच्या एलईडी दिव्यांच्या विरोधात शिवसेनेने आपला संताप व्यक्त केलेला आहे. कारण सोडियम व्हेपरच्या दिव्यांपेक्षा एलईडी दिव्यांची किंमत अडीचपट जास्त आहे. तेव्हा यामुळे कोणतीही मोठी बचत होत नाही. असे शिवसेनेचे म्हणणे आहे. सोलापूर नगरपालिकेने हा एलईडी दिव्यांचा प्रयोग केला होता. पण तो पूर्णपणे फसला हे दिवे काही प्रमाणात लाभदायक ठरू शकतात. परंतु त्याची खरेदी किंमत वाटेल तशी लावली जात आहे. तामिळनाडू सरकारने तर एलईडी दिवे बनवण्याचे तंत्रज्ञान शिकवण्याचे प्रकल्प सुरू केले आहेत. ज्यामुळे तरुणांना उद्योग मिळू शकतो. महाराष्ट्रात मात्र असे प्रयोग न करता मोठ्या उद्योजकांचे भले करण्याचा प्रयोग होत आहे. इतर वेळेला अनेक घोटाळ्यांबाबत बेंबीच्या देठापासून आरोळ्या ठोकणाऱ्या मुंबईतल्याच भाजपा नेत्यांच्या तोंडाला या नवनव्या प्रकारांमुळे टाळे ठोकले गेले आहे. तेव्हा अजूनही वेळ गेलेली नाही. सावध होण्याची गरज आहे.